## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १९८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०४/२०१८

**१) हिरव्या रंगाचा गांजा मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/०४/२०१८ चे १८.०५ वाजता यातील फिर्यादीने आरोपीची अंगझडती घेतली असता, आरोपीच्या कबज्यात अंदाजे १० ते १५ ग्रॅम ओलसर हिरव्या रंगाचा गांजा किंमती २५०/—रु. चा मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी अरूण भगवान कोरडे वय ३५ वर्ष भंडारा जिल्हा कारागृह भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २२ एनडीपीएस अॅक्ट. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि.खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी :—**

दिनांक १६/०४/२०१८ चे २१.१५ वाजता यातील फिर्यादीचा काका हनिफ रहीम बक्श चव्हाण वय ५० वर्ष, रा. बाबा मस्तानशहा वार्ड भंडारा, हा मेन रोडने पायी शामराव चौकातुन पान खावुन आपले साईडने घराकडे जात असता, त्याचे मागेहुन येणा—या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही हयगयीने, निष्काळजीपने चालवुन हनिफ यास मेनरोड रिगल गारमेंट दुकाना समोर भंडारा येथे धडक मारून दुखापत होण्यास कारणीभुत झाल्याने, फिर्यादी सुल्तान दिदार चव्हाण वय ५० वर्ष रा. बाबा मस्तान शाह वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि.खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) ट्रक भरधाव वेगाने अवैधरीत्या जनावरे वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक १७/०४/२०१८ चे ०९.३० वाजता यातील आरोपी १० चक्का ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक मध्ये एकुण १६ नग म्हशी अवैधरीत्या दाटीवाटीने ट्रकमध्ये कोंबुन व आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने, फिर्यादी प्रभातकुमार शामसुंदर मिश्रा वय ४५ वर्ष रा. भैयाजी नगर खातरोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९ भादवी. सहकलम ११(१),(घ),(ई) प्राण्यास निर्दयतेने वागवीण्याचा प्रतिबंध कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) ट्रक चालाकाने वाहनाला धडक देवुन वाहनाचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १७/०४/२०१८ चे ११.१५ वाजता यातील फिर्यादी पंकज गंगाधर जिभकाटे वय ३४ वर्ष, रा. डिसीएम कॉलोनी स्वामी विवेकानंद वार्ड भंडारा याने त्याचे ताब्यातील वाहन क्र. एमएच ३१ ईव्ही ६४६९ ही ट्राफीक साईडला थांबवुन ठेवले असता यातील आरोपी चालाकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे वाहनास मागेहुन अशोका हॉटेल समोर एनएच ६ रोड भंडारा येथे धडक मारुन अंदाजे ५०,०००/—रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) मोटार पंपची चोरी :–**

दिनांक १६/०४/२०१८ चे १९.०० वा. ते दि. १७/०४/२०१८ चे ०८.३० वाजता यातील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे शेतातील विहीरीवर एक १.५ एचपीची किसान गोल्ड क्र. ६३८५ किंमती १०,०००/–रु. ची चोरून नेल्याने फिर्यादी सचिन कवळु शरनागत वय २८ वर्ष रा. मोहाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**६) सोन्या–चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक १४/०४/२०१८ चे १५.०० ते. दि. १७/०४/२०१८ चे ०९.०० वाजता यातील फिर्यादी हा परीवारासह घराचे दाराला कुलुप लावुन बाहेरगावी लग्नाला गेले असता, कोणीतरी अज्ञात आरोपीने घराचे मागील दाराची कडी काढुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी आलमारीतील स्टील डब्यात ठेवलेला १ सोन्याचा गोफ वजन १० ग्रॅम , १ सोन्याची अंगठी ५ ग्रॅम, १ सोन्याची नथ ३ ग्रॅम, सोन्याचे टॉप्स ३ ग्रॅम, चांदीचे अंगठया १२ नग चांदीच्या अंगठया व नगदी १५,०००/रु. आसा एकुण ४८,५००/रु. चा माल अज्ञात चोराने चोरून नेल्याने, फिर्यादी अमतजीत हरीहरजी मोथरकर वय ३८ वर्ष रा. खरबी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. ताराम पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**७) सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक १७/०४/२०१८ चे १७.३० ते. १९.१७ वाजता यातील फिर्यादी मोहनलाल कुसन कावळे वय ३८ वर्ष, रा. कोसरा हा त्याचे घराला ताला लावुन पत संस्थेत गेला असता यातील अज्ञात चोराने फिर्यादीचे घरात कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घरा समोरील दाराची कडी कोंडा कोणत्यातरी वस्तुने काढुन आत प्रवेश करुन घरातील दोन्ही बेडरुम मधील आलमारीत ठेवलेली सोन्याची अंगठी ५ ग्रॅम, सोन्याची लेडीज अंगठी ३ ग्रॅम, सोन्याचा सिक्का ५ ग्रॅम, सोन्याचे ७० मनी लॉकेटसह १ तोडा, सोन्याचा डोरला ३ ग्रॅम, सोन्याचे रिंग २ ग्रॅम, सोन्याचे कानातील बाऱ्या २ ग्रॅम, सोन्याचे लॉकेट १.५ ग्रॅम, सोन्याचा गळयातील ताईत २ ग्रॅम, असा एकुण ३ तोडे ४५० ग्रॅम किंमती ६७,०००/–रु. व नगदी ३०,०००/–रु. असा एकुण ९७,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. किचक पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**८) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १७/०४/२०१८ चे १३.०० वाजता यातील फिर्यादी व आरोपी हे पती पत्नी असुन त्यांच्यात वाद असुन पटत नसल्याने फिर्यादी ही आपले वडीलाकडे राहते यातील आरोपी हा फिर्यादीला साई प्लाझा रेस्टॉरेंट भंडारा येथे भेटण्यास बोलाविले व शिवीगाळ करण्यास सुरुवात केली व त्यानंतर फिर्यादी ही रेस्टारेंटचे बाहेर निघाली व गाडीवर बसली असता आरोपीने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व फिर्यादीचे हात मुरकटुन गालावर थापड मारली व तिला व तीचे आई वडीलांना जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,३२३,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) अवैध हातभट्टी दारु अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक १७/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन सिहोरा व आंधळगाव येथे अवैध हातभट्टी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १२ लिटर हातभंट्टी दारू किंमती ७२०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

18.4.18

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.